MHKO100006412024

## <u>आदेश निशाणी क्र. १९</u>

१. वादी यांनी सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६ नियम १७ प्रमाणे दाखल केला आहे.

२. वादी यांचे असे कथन आहे की, वादी यांनी सदरचा दावा हक्कज्ञापन व मनाईकरीता दाखल केला आहे. दावा दाखल करताना नजरचुकीने व अनावधानाने प्रतिवादी क्र. ४ श्रीमती मालुबाई शिवराम कांबळे असे चुकीचे नाव नमूद केले आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. ४ श्रीमती मालुबाई शिवराम कांबळे ऐवजी श्रीमती मालुबाई आण्णाप्पा कांबळे अशी नावामध्ये दुरूस्ती करण्यास परवानगी मागितली आहे. सबब वादी यांनी सदरचा अर्ज मंजूर करणेत यावा व सुचविलेली दुरुस्ती दावेत करणेस परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी सदर अर्जास आपले म्हणणे सादर केले आहे. त्यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. ४ यांचे नावाची पहिलीच माहिती होती. वादी यांनी काम लांबणीवर टाकण्याचे उद्देशाने व प्रतिवादी यांना त्रास देण्याचे उद्देशाने अर्ज दाखल केला आहे. यदाकदाचित अर्ज मंजूर करावयाचा झाल्यास वादी यांना रक्कम रू. १०००/- कॉस्ट करण्यात यावी.

४. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूंनी त्यांच्या अर्जातील व म्हणण्यातील कथनाप्रमाणेच युक्तीवाद केलेला आहे. अभिलेखावरील दाखल कागदपत्रांचे बारकाईने अवलोकन केले.

५. वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादी यांचे विरुध्द हक्कज्ञापन व मनाईकरीता दाखल केला आहे. वादी यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. वादी यांनी दावेच्या मथळयात प्रतिवादी नं.४ च्या नावामध्ये "श्रीमती मालूबाई शिवराम कांबळे " ऐवजी " श्रीमती मालुबाई आण्णाप्पा कांबळे" अशी प्रस्तावित दुरुस्तीची मागणी केली आहे. वादी यांनी मागीतलेली प्रस्तावित दुरुस्ती ही मुळ दाव्याशी संलग्न व तांत्रीक स्वरुपाची अशी आहे. वादी यांचा अर्ज मंजूर केल्यामुळे दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. सबब सदरचा अर्ज वादीवर खर्च बसवून मंजूर करणे न्यायोचीत वाटते. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आ दे श

१) वादी यांचा अर्ज प्रतिवादी यांना खर्चादाखल रक्कम रुपये २००/- (रक्कम रुपये दोनशे मात्र) देणेच्या अटीवर अर्ज मंजूर करण्यात येतो.

२) वादी यांनी दाव्यात १४ दिवसांत अर्जाचे अनुषंगाने दुरुस्ती करुन घ्यावी व दाव्याची दुरुस्ती प्रत सत्वर दाखल करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2024.11.07 12:02:53 +0530

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक ०५/११/२०२४

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.
गडहिंग्लज